॥ क्षणी या दुभंगुनिया ॥

गायिकाः सुमन कल्याणपूर
गीतः यशोदकुमर गळवणकर
संगीतः दशरथ पुजारी

क्षणी या दुभंगुनिया घेई कुशीत माते,
अश्राप भूमिकन्या तुज आज आळविते ॥ धृ. ॥

पोटी रघुकुलांकुर जपण्यास प्राण धरिले
प्रतिराम करुनी त्यांना कर्तव्यपार झाले।
पुत्रास तात मिळती परि मी अनाथ उरते
अश्राप भूमिकन्या तुज आज आळविते ॥ १ ॥

मम अग्निदिव्य गाथा त्रैलोक्यसाक्ष असता
शंका पुन्हा जनी का? का त्याग भाळी होता?
नुसतीच वंचना ही हे न्यायदान खोटे
अश्राप भूमिकन्या तुज आज आळविते ॥ २ ॥

वच देह अन् मनाने पतिनिष्टताच जपली।
ध्यानी, मनी अन् स्वप्नी वैदेही राम स्मरली।
पतिधर्म ब्रीद माझे लवुनिया पणा ते
अश्राप भूमिकन्या तुज आज आळविते ॥ ३ ॥